कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

---

दिनांक ०२.११.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री.ओमप्रकाश यादव | : | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा.सहसचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा.संचालक, (लेखा व कोषागारे), महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | श्रीम.वेदा धवल आगटे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री.सतीश मगर | : | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री.अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री.श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री.विजय देवरुखकर | : | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस श्रीम. निलांबरी भोसले, सहायक कामगार आयुक्त तथा सचिव या वैद्यकीय रजेवर असल्यामुळे प्रभारी सचिव श्री. चं.अं. राऊत, सहायक कामगार आयुक्त यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष, शासन प्रतिनिधी,

मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधींचे स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयासंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरीत करण्यात आला.

सर्वप्रथम मा.अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर बैठकीत खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीची विषयसूची

**विषय क्र. १) : मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

दि. ०१.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. तत्पूर्वी कामगार प्रतिनिधी यांनी मागील बैठकीचा इतिवृत्तांत सर्व सदस्यांना १५ दिवसांपूर्वी पाठविण्यात यावा. अशी विनंती केली. मा.कामगार आयुक्त यांनी सदर विनंती मान्य करुन अंमलबजावणी करण्याबाबत सचिव, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांना सूचित केले.

**विषय क्र. २) केंद्र शासनाचे दि. ०९.०९.२०१५ रोजीचे आदेशानुसार मंडळाअंतर्गत योजना राबविताना कामगारांचे आर्थिक योगदान घेणेबाबत विचारविनिमय करणे.**

केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम, १९९६ च्या कलम ६० अंतर्गत “केंद्र शासन मंडळास अधिनियमातील कोणत्याही तरतूदींची अंमलबजावणी करणेबाबत दिशा देऊ शकतो,” अशी तरतूद आहे. तर कलम २२ नुसार मंडळातील लाभार्थीना आर्थिक सहाय्य तसेच विमा योजना इत्यादीचा लाभ मंडळाकडून देण्याची तरतूद आहे. त्यानुसार प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना व प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना लागू करुन या योजनांसाठी मंडळाने ५०% रक्कम भरावी व उर्वरित रक्कम लाभार्थी कामगारांकडून घेण्यात यावी, अशा सूचना केंद्र शासनाच्या आदेश दि. २७.०२.२०४ अन्वये देण्यात आल्या आहेत. याबाबत कामगार प्रतिनिधींनी असे सांगितले की, नोंदीत बांधकाम कामगारांकडून रक्कम वसूल करु नये, उर्वरित रक्कमही मंडळाने भरावी. यावर सर्वांनी सहमती दर्शविली. मा.

अध्यक्ष यांनी असे प्रतिपादन केले की, असे केल्यास मंडळांतर्गत योजनांवरील खर्च आधीच कमी आहे. तो पुन्हा कमी होईल. केंद्र शासनाने ५०% पर्यंत मर्यादा ठेवली आहे. तथापि, आपण १००% पर्यंत रक्कम अदा करू शकतो त्यामुळे सदर योजना लागू करण्यासाठी मंडळाकडून १०० % अनुदान देण्यात यावे व ज्यावेळी कामगारांची नोंदणी वाढेल त्यावेळी याबाबतीत फेरविचार करण्यात येईल. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. मा.अध्यक्षांनीही याला मान्यता दिली. त्यानुसार मंडळांतर्गत योजना राबविताना कामगारांचे आर्थिक योगदान न घेता संपूर्ण १०० % योगदान मंडळाने करावे. असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयक क्र. ३) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना लागू करणेबाबत.**

**विषय क्र. ४) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना लागू करणेबाबत.**

याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना या दोन्ही योजनांची थोडक्यात खालीलप्रमाणे माहिती दिली.

१. **प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना** - याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले की, या योजनेकरिता वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असून लाभार्थीचे बँकेत खाते असावे. रु.३३०/- प्रिमियम भरावा लागेल. लाभार्थिचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास रु.२ लाखाचे विमा संरक्षण या योजने अंतर्गत देण्यात येईल. यावर श्री.कुटासकर यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, मंडळाची देखिल रु.२ लाख मृत्यूलाभाची योजना आहे. तेव्हा या दोनपैकी एकाच योजनेचा लाभ अर्जदारास मिळेल काय ? यावर मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामध्ये नोंदीत लाभार्थींना या योजनेचा तसेच मंडळाच्या देखील योजनेचा लाभ घेता येईल.

२. **प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना** – याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले की, वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे असून सहभागी बँकांमधील बचत खाते धारक लाभार्थिस

रु.१२/- एवढा प्रिमियम भरावा लागतो. या योजने अंतर्गत लाभार्थ्याला खालीलप्रमाणे लाभ देय असतील.

फायदे :- १. अपघाती मृत्यू झाल्यास रु.२ लाखाचे संरक्षण

२. दोन्ही डोळे अथवा दोन्ही पाय अथवा दोन्ही हात पूर्णपणे गमावल्यास अथवा एक डोळा व एक हात अथवा एक डोळा व एक पाय पूर्णपणे गमावल्यास रु.२ लाखाचे विमा संरक्षण.

३. एक डोळा अथवा एक हात अथवा एक पाय पूर्णपणे गमावल्यास रु.१ लाखाचे विमा संरक्षण.

मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, श्री.परदेशी साहेब यांच्याशी चर्चा झाली असता, त्यांनी या दोन्ही योजना कामगारांसाठी लाभदायी आहेत. या दोन्ही योजनांचा प्रिमियम कमीत कमी आहे. त्यामुळे या योजना तात्काळ लागू कराव्यात, असे सूचित केले आहे. त्यानुसार कामगारांची नोंदणी ज्याप्रमाणे होईल, त्यानुसार या योजनेचा लाभ त्या लाभार्थी कामगारांना देण्यात येईल. याबाबत सद्यस्थितीमध्ये नोंदित बांधकाम कामगार संख्या ४,२३,००० एवढी असून त्याचा खर्च खालीलप्रमाणे आहे.

३३० X ४,२३,००० =१३,९५,९०,०००/-

१२ X ४,२३,००० = ५०,७६,०००/-

--------------------------------------------

एकूण रू. १४,४६,६६,०००/-

(रू. चौदा कोटी सेहचाळीस लाख सहासष्ट हजार फक्त)

वरीलप्रमाणे दोन्ही योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ५) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना कौशल्यवृध्दी योजना लागू करण्याबाबत विचारविनिमय करणे.**

मा. सहायक कामगार आयुक्त यांनी सदर योजनेबाबत (silent features) सांगितली. तसेच योजनेबाबत विस्तृतपणे मा. कामगार आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. केंद्राने सर्व राज्यांना (RPL) scheme बाबतच्या गाईडलाईन्स दिल्या आहेत. त्यामध्ये आर.पी.एल. साठी काही एजन्सी एम्पॅनल केल्या आहेत. त्या एजन्सीमार्फत दिलेल्या गाईडलाईन्सप्रमाणे ज्या बांधकामाच्या साईटवर २०० पेक्षा जास्त कामगार काम करतात, तिथे तात्पुरते ट्रेनिंग सेंटर चालू करावे. प्रथमत: बांधकाम कामगारांचे असेसमेंट करून त्या बांधकाम कामगारास कुठल्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे हे बघणे व त्यास प्रशिक्षण देणे. प्रशिक्षणानंतर त्याचे असेसमेंट करणे आवश्यक आहे. याबाबत केंद्रशासनाच्या निर्गमित केलेल्या धोरणानुसार २० टक्के निधी कौशल्यवृध्दी व वाढीसाठी खर्च करावा, असे सूचित केले आहे. याबाबत महाराष्ट्रातील कोणत्या एजन्सीला यासाठी इम्पॅनल करावे यासाठी आपण विभागनिहाय प्रस्ताव मागवणे आवश्यक आहे व अंतिमत: इम्पॅनल झालेल्या एजन्सीमार्फत ही योजना राबविण्यात येईल. मंडळाने सदर पॉलिसी अद्ययावत करुन राबवावी व महाराष्ट्र शासनाने, प्रमोद महाजन कौशल्यवृध्दी योजना असे नाव या योजनेस दिलेले आहे, ते तसेच कायम ठेवावे, असे मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले. त्यास मा. कामगार आयुक्त व इतर सदस्यांनी अनुमोदन दिले.

**विषय क्र. ६) बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती / कागदपत्रे जमा करण्यासाठी बाह्य यंत्रणेची नियुक्ती करण्यासाठी IT कंसल्टंटची नियुक्ती करण्याबाबत.**

मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र शासनाने ५ IT कंसल्टंट कंपन्यांना इम्पॅनल केलेल्या आहेत. मंडळाला नोंदणीच्या कामासाठी बाह्ययंत्रणेद्वारे आर.एफ.पी. तयार करण्यासाठी २ कंसल्टंटची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांनी लवकरात लवकर एक सिनियर कंसल्टंट घेण्याचे सुचविले. मा. कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणले की, सध्या कामगार विभागात मे.असेंचर ही कंपनी नियुक्त केली असून ती याठिकाणी इतर प्रक्लपांवर काम करीत आहे. तर याच कंपनीतील एक सिनिअर कंन्सल्टंट

व एक कंन्सल्टंट यांची नियुक्ती केल्यास त्यांच्या कामगार विभागातील अनुभवाचा फायदा मंडळास होईल.

याबाबत चर्चा होऊन मे. असेंचर या कंपनीकडून मंडळांतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्पासाठीचे आर.एफ.पी. डॉक्युमेंट बनवून घेण्यासाठी एक सिनिअर कंन्सल्टंट व एक कंन्सल्टंट यांची नियुक्ती करणेबाबत सर्वानुमते ठराव मान्य करण्यात आला. तसेच आर.एफ.पी. डॉक्युमेंट बनवून झाल्यानंतर तीन महिन्यानंतर सिनिअर कंन्सल्टंटची नियुक्ती रद्द केली जाईल व केवळ एक कंन्सल्टंट पुढील एका वर्षाकरीता मंडळांकडे नियुक्त राहील, असेही ठरले.

तसेच. कंन्सल्टंट योग्य न वाटल्यास त्यात बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त यांना राहिल.

**विषय क्र. ७) मंडळाकडे प्राप्त झालेल्या उपकर परताव्याच्या प्रकरणांबाबत धोरण ठरविणे.**

याबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी असे उपस्थितांच्या निदर्शनास आणले की, मंडळाकडे उपकरातंर्गत जमा होणा-या रकमेत काही प्रकरणे असे आहेत की, ज्यामध्ये काही प्राधिकरणांकडून/मालक/बिल्डर/कंत्राटदार यांच्याकडून चुकून मंडळाच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आलेली आहे. अशा प्रकरणांमध्ये अनेक प्रकरणांसाठी विविध प्राधिकरण/मालक/कंत्राटदार यांनी मंडळास पत्र देऊन सदर चुकूने भरण्यात आलेली रक्कम मिळण्याची विनंती केली आहे. तथापि, याबाबत मंडळाचे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. याबाबत सविस्तर चर्चा होऊन उपकर परताव्याची प्रकरणे निकाली काढण्यासाठी मंडळातील सभासदांची एक उपसमिती नेमण्यात यावी व त्या समितीमार्फत प्रकरणांची सखोल चौकशी करून प्रकरणे निकाली काढण्यात यावी, असे मंडळाने ठरविले. यामध्ये मा. अध्यक्ष यांनी खालील सभासदांची उपसमितीमध्ये निवड असावी, असे सूचित केले. त्यानुसार मा. अध्यक्ष, मा. कामगार आयुक्त, मा. संचालक (लेखा व कोषागारे) व मालक प्रतिनिधी श्री. सतीश मगर यांची उपसमिती

मंडळांतर्गत उपकर परताव्याच्या प्रकरणांवर कार्यवाही करण्यासाठी गठीत करण्याचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.८) मंडळातील योजनांच्या लाभाची रक्कम वाढविणेबाबत विचारविनिमय करणे.**

मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, सध्या प्रचलित असलेल्या योजनांबाबत, योजनानिहाय लाभाची रक्कम वाढविण्यात यावी किंवा कसे याबाबत चर्चा करण्यात आली. त्यावर मा. अध्यक्ष यांनी असे मत मांडले की, सद्यस्थितीमध्ये योजनांवरील झालेला खर्च खूप कमी असून योजनांवरील खर्च वाढणे आवश्यक आहे. यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सूचित केले की, इतर राज्यातील मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना व त्याचा लाभ इत्यादी माहिती एकत्रित करून घेण्यात येईल जेणेकरून आपल्या योजनांबाबतची रक्कम ठरविणे सोईस्कर होईल. याबाबत गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, दिल्ली, तामिळनाडू, कर्नाटक इत्यादी राज्यातील माहिती घेण्याबाबत मा. सहायक कामगार आयुक्त यांना सांगितले व सर्व माहिती घेऊन इतर राज्यांनी दिलेल्या लाभापेक्षा आपण जास्त लाभ देवू, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९) नोंदित बांधकाम कामगारांना साहित्य खरेदीसाठी रुपये पाच हजार प्रति कामगारांना अर्थसहाय्य वाटप करणेबाबत.**

मा.अध्यक्षांनी वरील साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्याकरिता शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे का अशी विचारणा केली असता, मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक २६.०२.२०१४ रोजीच्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये मुद्दा क्र. ०५ मध्ये दिल्यानुसार मंडळातील नोंदीत कामगारास प्रति कुटुंब दर तीन वर्षातून एकदा रु.५०००/- अवजारे / हत्यारे खरेदी करण्याकरिता आर्थिक सहाय्य देण्यात यावे, असे नमूद आहे. यावर मा. अध्यक्षांनी याबाबतचा प्रस्ताव त्वरीत शासनाला पाठवावा, असे सांगितले. त्यावर मा. कामगार आयुक्त यांनी स्पष्ट केले की, याबाबतचा मंडळाचा ठराव झाल्यानंतर शासनाची मान्यता घेण्यात येईल, शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर अर्थसहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता, नोंदित बांधकाम कामगारांकडून अर्ज भरुन

घेण्यात येईल. तसेच त्यामध्ये प्रतिज्ञापत्र असेल. त्यांचे बँकडिटेल्स घेऊन डी.बी.टी पध्दतीने
आर.टी.जी.एस.मार्फत साहित्य खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य वाटप करण्यात येईल. कामगारांनी
मगवयाचा फॉर्मचा नमुना मंडळामार्फत तयार केला जाईल. सदर योजनेस वरीलप्रमाणे नोंदित
कामगारास प्रति कुटुंब ३ वर्षातून एकदा हत्यारे/ अवजारे खरेदी करण्यासाठी रक्कम रू. ५ हजार
आर्थिक सहाय्य देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. १०) मा.अध्यक्षांचे मानधन ठरविण्याबाबत.**

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक शासाउ १०.१०/ प्र क्र ९६/ सा.उ., दि. १३.०३.२०१२ च्या
जोडपत्र -१ मधील राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या अध्यक्षांना देय सोयी सुविधांचे मानधन रु.७५००/-
नमूद आहे. तथापि, ते फार कमी असल्याचे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले. श्री.भुताड,
कामगार प्रतिनिधी यांनी यामध्ये १०% वाढ करावी, असे सुचविले. यावर सविस्तर चर्चा होऊन
अंतिमत: मा. कामगार आयुक्त यांनी मा.अध्यक्षांचे मानधन एकत्रितपणे रु.२५,०००/- असावे असे
मत मांडले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली. त्यानुसार मंडळाच्या मा. अध्यक्षांना
रु.२५,०००/- मानधन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात येईल असे मा. कामगार आयुक्त
यांनी सांगितले.

**विषय क्र. ११) मंडळासाठी अंतर्गत सनदी लेखापालाची नियुक्ती करणेबाबत.**

मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील अकाऊंटस् मेन्टेन करणे,
ऑडिट करणे व बँक रिकन्सिलिएशनसाठी, TDS विषयक कामकाज करणे, ऑडिटिंग करणे इ.
कामांसाठी लेखापालाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. यापूर्वी या कामासाठी असे लेखापाल
नियुक्त केले गेले होते. त्यानुसार पुढील ३ वर्षांच्या कामासाठीही दरपत्रक मागवून त्यातून एका
कंपनीचा लेखापाल ऑडिटींगसाठी नियुक्त करणे आवश्यक आहे. त्यानुसार ३ दरपत्रक मागविले
गेले व त्यामध्ये श्री.टी.पी.डबले अँण्ड कं., नागपूर यांचे दर कमी असून गुणवत्ता चांगल्या दर्जाची
असल्यामुळे त्यांना मंडळाच्या सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या हिशेब तपासणीचे (स्टॅटयुटरी

ऑडिटिंगचे) काम करण्यासाठी नियुक्त करण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात

आला.

तसेच यापूर्वी मंडळाचे सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे अकाऊंटींग व डेटा एंट्रीचे कामकाज

मे. सतीश बडवे अ‍ॅण्ड कंपनी यांना आदेश दि. १६.०३.२०१५ अन्वये देण्यात आले होते, सदर

अकाऊंटींग व डेटा एंट्रीचे कामकाज उत्कृष्टरित्या पूर्ण केल्याचे मा. कामगार आयुक्त यांनी सर्व

उपस्थितांना स्पष्ट केले व आर्थिक वर्ष सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ चे अकाऊंटींग व

डेटा एंट्रीचे कामकाज मे. सतीश बडवे अ‍ॅण्ड कंपनी यांना देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित

करण्यात आला.

**विषय क्र. १२) आयत्या वेळेचे विषय**

**१. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दि.२७.१०.२०१५ नुसार मंडळाच्या**

**अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीचे धोरण ठरविणे.**

मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळांतर्गत अतिरिक्त निधीची

गुंतवणूक शासन निर्णयात ज्या सूचना दिल्या आहेत त्याप्रमाणेच गुंतवणूक करण्यात येते

व ही गुंतवणूक नॅशनलाईज्ड बँकांमध्येच करण्यात आली आहे. याबाबतीत संपूर्ण

अधिकार मंडळाकडे आहे. गुंतवणूक करावयाच्या प्रक्रियेमध्ये आपण सर्व बँकांकडून

सिलबंद लिफाफयात दर मागवितो. संबंधित बँकाचे प्राधिकृत अधिकारी ठरलेल्या दिवशी

सिलबंद लिफाफे घेऊन उपस्थित होतात. सर्व उपस्थितांच्या समक्ष सिलबंद लिफाफयातील

दर उघडले जातात व ज्या बँकेने सर्वांत जास्त दर देऊ केला आहे, अशा बँकेत मंडळाच्या

निधीची एक वर्षासाठी गुंतवणूक केली जाते. यापूर्वी केलेली गुंतवणूक अधिकाऱ्यांकडून

तपासून घेतली असून ती सर्व मूळ प्रमाणपत्रासह आढळून आलेली आहे.

याबाबत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना देखील गुंतवणूक प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता

येईल व गुंतवणूक उपसमिती स्थापन करून गुंतवणुकीचे निर्णय घेण्यात येतील, असे मा.

अध्यक्ष यांनी सुचविले. गुंतवणूक उपसमितीस स्थापन करण्याबाबत मा. अध्यक्षांनी व सर्व

उपस्थितांनी मान्यता दिली. याबाबत गुंतवणुकीचे धोरण ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यात आली. १. मा. अध्यक्ष २. मा. कामगार आयुक्त ३. मा.संचालक, लेखा व कोषागारे ४. श्री. भुताडे, कामगार प्रतिनिधी ५. श्री. सतीश मगर, मालक प्रतिनिधी. सदर उपसमितीस मंडळाच्या रक्कमेची गुंतवणूक करण्याचे संपूर्ण अधिकार असतील. तथापि, प्रत्येक महिन्याला गुंतवणूकीचा अहवाल मंडळासमोर ठेवावा, असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**२. मंडळांतर्गत गुंतवणुकीचे प्रमाणपत्र ठेवण्यासाठी उघडण्यात आलेले सिक्युरिटी लॉकर operate करण्याचे अधिकार मंडळाचे सचिव यांना प्रदान करणे.**

मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले की, हे सिक्युरिटी लॉकर ऑपरेट करण्याचे अधिकार मंडळाचे सचिव यांना प्रदान करण्यात यावे. त्यास सर्व प्रतिनिधींनी मान्यता दिली.

तसेच अकाऊंटस मेन्टेन करण्यासाठी सहायक लेखा अधिकारी व लेखा अधिकारी अशी २ पदे मंडळास उपलबध करुन देण्याबाबत संचालक, (लेखा व कोषागारे) यांना विनंती करण्यात आली व त्यास मा. संचालक यांनी सदर पदे लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

**३. महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, जर्मन सोशल ॲक्सिडेंट इन्शुरन्स यांच्यातील बांधकाम कामगारांच्या सुरक्षा उपाययोजनांबाबत झालेल्या करारानुसार होणाऱ्या कार्यक्रमाबाबत.**

मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले की, सदर विषयाबाबत २ वर्षापूर्वी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रमाणे दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ ला कार्यशाळा आयोजित केलेली आहे. त्याकरिता मंडळाने ५० % खर्च करावा व जर्मन सोशल ॲक्सिडेंट इन्शुरन्स हे ५० % खर्च करणार आहे. साधारणत: रू. ५ ते ६ लाख खर्च येईल. सदर खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

४. मा.अध्यक्ष यांनी असे नमूद केले की. मागील बैठकीत ठरल्यानुसार आरोग्य विमा योजनेसाठी ब्रोकर नियुक्त करणे. मंडळाची माहिती पुस्तिका छापणे व मंडळासाठी स्वतंत्र कार्यालय भाडेतत्वावर घेणे इ. बाबत ई-निविदेच्या अटी व शर्ती ठरविण्यासाठी मा. अध्यक्ष. मा. कामगार आयुक्त व मा. संचालक (लेखा व कोषागार) या उपसमितीची दि. ०६.१०.२०१५ रोजी बैठक पार पडलेली आहे. सदर उपसमितीने उपरोक्त तीनही बाबींच्या ई-निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविलेल्या आहेत. सदर उपसमितीस सदर अटी व शर्तीमध्ये सुधारणा/बदल करण्यात आलेल्या निविदांचे शॉर्ट लिस्टिंग करणे, पात्र कंपन्यांचे सादरीकरण बघणे व त्यांचे मूल्यमापन करुन त्यातून एकाची निवड करण्याचे संपूर्ण अधिकार सदर उपसमितीस असतील, असे मा. अध्यक्षांनी सांगितले व त्यास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. सदर अटी व शर्ती मा. अध्यक्ष यांनी मंडळासमोर सादर केल्या व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत मा. कामगार आयुक्त यांना सूचित केले.

५. मा.अध्यक्षांनी मंडळाकडे जमा झालेला पैसा कोणाकडून आलेला आहे, ते मंडळास माहिती असावे. कामगार प्रतिनिधी श्री.कुटासकर यांनी मंडळाकडे जितका निधी आला व धनादेश परत का केले, हे मंडळास दाखविले पाहिजे, असे मत मांडले.

मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, पूर्वी काही धनादेश बँकेत भरले गेले ते बाऊन्स झाले अथवा वटले गेले नाहीत, त्या सर्व धनादेशांबाबत बँकेकडून माहिती मागविली आहे व त्यांच्याकडून या प्रक्रियेला वेळ लागत आहे.

मा. कामगार प्रतिनिधींनी मागील बाउन्स झालेल्या चेकबाबत बँकेकडून आवश्यक माहिती, स्टेटमेंट घेऊन यादी मंडळासमोर ठेवावी अशी मागणी केली. याबाबतीत मा. कामगार आयुक्त यांनी बाऊन्स झालेले चेक व त्यांची यादीही मंडळासमोर ठेवण्यात येईल, असे सांगितले.

बैठकीच्या शेवटी मा.अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानून बैठक अनिश्चित कालावधीसाठी समाप्त केली.

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर**
**बांधकाम कामगार कल्याणकारी**
**मंडळ, मुंबई-४०० ०५१.**